<u>सत्र प्रकरण क्रमांक ५२/२०२२</u>
<u>निशाणी क्रमांक ५३/क</u>

सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०३ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नांव :— गणेश अशोक जमदाडे

वय :— ३३ वर्षे व्यवसाय :— खाजगी नोकरी

राहणार :— चिखली पुणे ता. जि. पुणे

---

**<u>सरतपासणी { ॲड. एन. ए. ताडेवाड सहा.सरकारी वकील }</u>**

०१. फिर्यादी अशोक जमदाडे हे माझे वडील आहेत. मी कोर्टासमोरील दोन्ही आरोपीना ओळखतो. अर्चना ही माझे भावाची बायको आहे. मयत अनिल हा माझा भाउ होता. अनिलला दोन मुली आहेत. दिनांक १८/६/२०२० रोजी मी व माझी आई घराचे गच्चीवर झोपलेलो होतो. मध्यरात्री १२ ते १२.३० वाजता मला माझे वडीलांचा ओरडण्याचा आवाज आला. त्यामुळे खाली गेलो त्यावेळी माझा भाउ अनिल याने स्लॅबच्या हुकला दोरीने गळफास घेतलेला दिसला. तेथे गावातील लोक जमले. त्यांनी पोलीसांना कळवले. तेथे एक लिहुन ठेवलेली चिठठी होती. मी ती पाहिली. माझे भावाचे पत्नीकडुन त्याला त्रास होता. माझे आईवडील व भाउ वहिनीला आणायला तिचे गावी आणायला गेले होते परंतु त्यांनी पाठवले नाही. त्यामुळे माझा भाउ अर्जुन नवले यांचे घरी गेला. त्याने त्याच्या पत्नीला पाठवा असे म्हणाला परंतु तेथे त्याचा अपमान करण्यात आला. माझे भावाचे व त्याचे पत्नीचे भांडण होत असायचे. मी गावाकडे आल्यावर त्यांना समजुन सांगायचो परंतु भावाची पत्नी ऐकत नव्हती. नंतर तिने सांगितले की एक रिक्षा घे व जमीन तिचे नावावर कर. त्यांना वडीलांनी जमीन व घर वाटुन दिले. पोलीस आल्यावर त्यांनी प्रेताचा पंचनामा केला. सदरचे प्रेत मीच ओळखले. मला आता दाखवण्यात आलेला पंचनामा तोच असुन त्यावर माझी सही आहे. मजकुर बरोबर आहे. **तो नि. ५४ वर आहे.** माझे भावाचा साडु सुध्दा आमचे शेजारीच रहातो. त्यांनी माझे भावाशी भांडण करुन माझे भावाला मारणेसाठी गावातील मुले जमवली होती. त्यावेळी गावातील पोलीस पाटील वगैरे लोकांनी ते भांडण मिटवले. दुसरे दिवशी पुन्हा पोलीस आले होते. त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. मी माझे भावाची चिठठी व फास घेतलेली दोरी ओळखु

सत्र प्रकरण क्रमांक ५२/२०२२
निशाणी क्रमांक ५३/क

शकेन. मला आता दाखवण्यात आलेली नि. ४१ वरील जप्त चिठठी तीच असुन त्यातील अक्षर माझे भावाचे आहे. मला आता दाखवण्यात आलेली जप्त दोरी माझे भावाने फास घेतलेली दोरी आहे. सदरची दोरी आर्टीकल अ वर आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे श्री पी. बी. राख वकील—**

२. माझे शिक्षण बी. सी. ए. झालेले आहे. अनिलचे लग्न झाले त्यावेळी माझी बारावी झाली होती व त्यानंतर मी पुणे येथे शिक्षणाला गेलो. माझे ग्रॅजुएशन पुणे येथे झाले. हे म्हणणे खरे आहे की मी पुणे येथेच नोकरीला लागलो. हे म्हणणे खरे आहे की मी फक्त सुटी व सणासाठीच गावी येत होतो. हे म्हणणे खरे आहे की घटनेच्या दिवशी मी पोलीसांना फोन केला नव्हता. साक्षीदार सांगतो की आंम्ही त्या परिस्थीतीत नंव्हतो. माझी मन:स्थिती अंदाजे १५ दिवस ठीक नंव्हती. पोलीसांनी घटनेचे दिवशी माझेकडे चौकशी केली होती. त्या दिवशी पोलीसांनी माझा जबाब घेतला होता. हे म्हणणे खरे आहे की त्यानंतर पोलीसांनी माझा जबाब नोंदवला नाही व पोलीस माझेकडे आले नाहीत. मी पोलीसांना माझा भाउ दोरीला लटकलेला होता हे सांगितले होते. मी पोलीसांना गावातील लोक जमले, त्यांनी पोलीसांना फोन केला, तसेच तेथे चिठठी पडली होती, तसेच माझे भावाला पत्नीकडुन त्रास होता इथपासुन ते मी गावाला आल्यावर त्यांना समजुन सांगायचो हा सर्व मजकुर मी पोलीसांना सांगितला होता. मी पोलीसांना वहिनी भावाला रिक्षा घे, जमीन नावावर करायची वगैरे तसेच पोलीस पाटलांनी मध्यस्थी करुन भांडण मिटवले वगैरे मजकुर सुध्दा सांगितले होते. वरील सर्व मजकुर माझे जबाबात का लिहिला नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की माझे भावाचे प्रेत खाली उतरवुन त्याला दवाखान्यात नेण्याचा प्रयत्न केला नाही. हे म्हणणे खरे आहे की माझे व अनिलचे विवाहानंतर माझे वडीलांनी लेखी वाटपपत्र केले नंव्हते. हे म्हणणे खरे आहे की कोरोना सुरु झाल्यानंतर मी एप्रिल २०२० मध्ये गावी आलो. हे म्हणणे खरे आहे की अर्चना ही एक महिन्यापुर्वी गावी गेली होती. हे म्हणणे खरे आहे की मी अर्चनाला तिचे माहेरी काठोडा येथे आणणेसाठी गेलो नव्हतो. मी अर्चनाला स्वत अथवा भावामार्फत, वकीलामार्फत त्रास देण्याबाबत नोटीस पाठवली नव्हती.

३. माझा विवाह सन २०१८ साली झाला. हे म्हणणे खरे आहे की माझे लग्नानंतर एक वर्षाने अनिलला मागील दोन रुम राहणेसाठी वाटुन दिल्या होत्या. हे

<u>सत्र प्रकरण क्रमांक ५२/२०२२</u>
<u>निशाणी क्रमांक ५३/क</u>

म्हणणे खरे आहे की माझे लग्नाचे वेळी अनिलला दोन मुली झाल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की माझे विवाहाचे वेळी मी पुण्याला खाजगी कंपनीता नोकरीला होतो. हे म्हणणे खरे आहे की माझे बी. सी. ए. चे शिक्षण खाजगी शिक्षण संस्थेत झाले. हे म्हणणे खरे आहे की आमचे कुटुंबाला शेतीव्यतीरीक्त साधन नाही. हे म्हणणे खरे नाही की माझे बी. सी. ए. चे शिक्षणासाठी अर्चनाने तिचे गंठन मोडुन पैसे दिले होते. हे म्हणणे खरे आहे की अनिल हा डी. एड. झालेला होता. हे म्हणणे खरे नाही की त्याला शिकलेली बायको पाहिजे होती. हे म्हणणे खरे आहे की अनिल हा आईवडीलांशी बोलायचा तसेच माझेशी सुध्दा बोलायचा. हे म्हणणे खरे नाही की अनिल हा त्याला शिकलेली बायको मिळाली नाही म्हणुन लग्नानंतर काही दिवस माझेकडे रहायला आला होता. सध्या मी पुण्याला माझे स्वत:चे फॅलटमध्ये रहात नाही. हे म्हणणे खरे आहे की सुरवातीला मी चिखलीच्या जवळ मोई येथे रहात होतो.हे म्हणणे खरे नाही की मी मोई येथील घर विकुन सध्याचा फॅलट बुक केला आहे. हे म्हणणे खरे आहे की अनिलचे मृत्यनंतर मी गावी नवीन घर बांधले आहे.

४. हे म्हणणे खरे नाही की ग्रामीण पोलीस स्टेशनला आरोपी अर्चना हिने माझा भाउ तिला दारु पिउन मारहाण करतो म्हणुन तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे आहे की अर्चनाचे त्रासाबाबत मी, माझे आईवडील व भाउ यांनी कोणत्याही पोलीस स्टेशनला तक्रर दिली नाही.

**प्रश्न—** तुम्ही स्वत तुमचा भाउ व्यसनाधीन झाला म्हणुन त्याचेवर उपचार केले नाही.

**उत्तर—** तो दारु पीत नंव्हता.

५. मला अर्चना ही माझे भावाला व्यसनामुळे नेहमी आजारी पडल्यावर दवाखान्यात घेवुन जायची याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की माझे भावाला त्याचे साडुने भांडण करुन मारहाण केल्याबाबत मी व माझे घरच्यांनी कोठेही तक्रार केली नाही. हे म्हणणे खरे नाही की अर्चनाच्या मुलींना आमचे जमीनीत हिस्सा मिळु नये म्हणुन तिचे विरुध्द व आरोपीविरुध्द आम्ही सर्वानी विचार करुन ही खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की माझे भावाला त्याची पत्नी त्रास देत होती, आईवडील आणायला गेले, भाउ अर्जुन नवले यांचेकडे गेला, तेथे त्याचा अपमान झाला इत्यादी सर्व मजकुर खोटा सांगतो. हे म्हणणे खरे नाही की सरतपासातील संपुर्ण मजकुर खोटा असुन चिठठी व दोरीबाबत मी खोटे कथन केले

<u>सत्र प्रकरण क्रमांक ५२/२०२२</u>
<u>निशाणी क्रमांक ५३/क</u>

आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृती,

RENUKA MANIKRAO SATAV

Digitally signed by RENUKA MANIKRAO SATAV
Date: 2026.04.30 14:59:52 +0530

**( रेणूका मा. सातव )**

दिनांक :३०/०४/२०२६

अतिरीक्त सत्र न्यायाधीश, बीड